**नियमित दिवाणी मुकदमा क्र. ५६/१९९३**

**नि. २२८ वरील आदेश**

अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.१, २, ५ ते ७, ११, १३, १४, १६ व १७ यांनी त्यांना दुरूस्त दाव्यावर अतिरिक्त कैफियत दाखल करण्यासाठी परवानगी मिळण्याकरीता दिलेला आहे.

२. दावा व रोजनामा पाहिला. प्रस्तुतचा दावा १० वर्षाहून अधिक जुना आहे. सदरचा दावा मूळ वादी क्र. १ते ३ यांनी प्रतिवादी यांच्याविरूध्द दावा मिळकतीवर प्रतिवादींनी केलेले अतिक्रमण काढून त्याचा ताबा मिळण्यासाठी व कायम ताकीद आदेशासाठी दाखल केलेला आहे. दावा प्रलंबित असताना वादींनी दावा मिळकत प्रस्तुतच्या वादीस विकल्यामुळे त्याने दिलेल्या नि. १३२ च्या अर्जानुसार त्याला वादी क्र. १ ते ३ च्या ऐवजी वादी म्हणून दाव्यात समाविष्ट करण्यात आलेले आहे. सदर नि. १३२ च्या अर्जानुसार दाव्यात दुरूस्ती दिनांक ३०/०७/२०१० रोजी होवून वादीने नि. १४३ कडे दिनांक २५/०८/२०१० रोजी दुरूस्त दाव्याची प्रत दाखल केलेली आहे. परंतु, त्यादिवशीच्या रोजनाम्यानुसार दुरूस्त दाव्यावर प्रत दाखल केल्यानंतर प्रतिवादींनी अतिरिक्त कैफियत दयावी असा दाव्याचा टप्पा ठेवण्यात आलेला नव्हता व दावा वादीतर्फे साक्षीदार क्र. १ चा सरतपास देण्यासाठी नेमण्यात आलेला होता. वास्तविक दिनांक २५/०८/२०१० रोजी वादीने दुरूस्त दाव्याची प्रत दिल्यानंतर दावा हा प्रतिवादींच्या अतिरिक्त कैफियत देण्यासाठी नेमणे आवश्यक होते. परंतु, तसा दाव्याचा टप्पा न ठेवल्यामूळे प्रतिवादींनी दाव्यात अतिरिक्त कैफियत दिलेली नसल्याचे दिसून येते. त्यानंतर वादीने दाव्याचे स्वत:चे पुराव्याचे शपथपत्र दखल केलेले असुन दावा वादीच्या उलटतपासासाठी प्रलंबित आहे व त्यानंतर प्रतिवादींनी सदरचा अर्ज दिल्याचे दिसते.

३. प्रस्तुत अर्जासोबत प्रतिवादी अतिरिक्त कैफियत देवून वादी यांस मुळ वादींच्या जागेवर दावा पुढे चालवण्याचा अधिकार आहे की नाही याबाबतची हरकत घेवू इच्छित आहेत. प्रतिवादींना दुरूस्त दाव्यावरील कैफियत देण्याची संधी नाकारली तर त्यांना वरीलप्रमाणे आपली हरकत घेण्याचा हक्क गमवावा लागेल व त्यामुळे त्यांच्या बचावास पुष्टी मिळणार नाही. तसेच सदर दाव्यात अद्यापपावेतो वादीचा उलटतपास झालेला नसल्यामुळे प्रतिवादींची अतिरिक्त कैफियत आल्यास त्यामुळे वादीचे नुकसान होईल असे दिसून येत नाही. तसेच वर नमुद केल्याप्रमाणे दाव्यात दुरूस्त दाव्याची प्रत दाखल केल्यानंतर दावा दुरूस्त दाव्यावरील कैफियत देण्याकरीता नेमणे गरजेचे होते व त्यामुळे प्रतिवादींनी कैफियत दिली नसल्याने सदर दुरूस्त दाव्यावरील कैफियत न देण्यामागे प्रतिवादींचा दोष असल्याचे दिसून येत नाही. परंतु, प्रस्तुतचा दावा हा अतिशय जुना असून सदरची दुरूस्ती ही सन २०१० मध्ये झाल्यानंतर सन २०१६ मध्ये म्हणजे सुमारे ६ वर्षाने सदरचा अर्ज प्रतिवादींनी दिलेला आहे. वास्तविक नि. १३२ च्या अर्जावर आदेश झाल्याची बाब प्रतिवादींना माहिती असल्यामुळे त्यावर त्यांनी स्वत:हून कैफियत देणे आवश्यक होते. परंतु प्रतिवादींनी तशी दुरूस्त दाव्यावरील कैफियत दाखल करण्याची तसदी घेतली नाही. यावरून प्रतिवादी यांचासुध्दा त्यात निष्काळजीपणा दिसून येतो.

परंतु केवळ तेवढया चुकीकरीता प्रतिवादींना दुरूस्त दाव्यावरील कैफियत देण्याची संधी नाकारली तर त्यांना स्वत:चा बचाव व्यवस्थित मांडता येणार नाही व त्यामुळे त्यांचे नुकसान होईल. सबब वरील बाबींचा विचार करता न्यायाच्या हिताच्या दृष्टीने विलंबाकरीता प्रतिवादींनी वादीला खर्च देण्याच्या अटीवर अर्ज मंजूर होण्यास पात्र दिसतो. सबब मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मागणीप्रमाणे मंजुर केला .

२. प्रतिवादींनी वादीला खर्च म्हणून रक्कम रूपये ५००/— (रूपये पाचशे मात्र) दयावे.

सही/—
(एम्. एस्. बुधवंत)
दिनांक :—१५/०९/२०१६. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), सावंतवाडी.